MHDH040008102022

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८५/२०२२</u>**

<u>जैतुनबी गफ्फारशा फकीर व इतर वि. निरंक</u>

**<u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>**

अर्जदार यांनी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हे मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा जि. धुळे येथील रहिवासी असुन मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर हे अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील होते. गफ्फारशा अब्बासशा फकीर हे दिनांक २६.०४.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तसेच मयताची आई नामे बानोबी अब्बासशॉ फकीर हया देखील दिनांक २३.०३.१९९७ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांना त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार पत्नी नामे जैतुनबी गफ्फारशा फकीर, मुले नामे अकबर गफ्फार फकीर, शरीफ शा गफ्फार शा फकीर, असलम शा गफ्फार फकीर व मुलगी नामे सलमाबी जाकीर शाह फकीर असे कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणतेही अन्य वारस नाहीत.

३. मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर हे महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी, दोंडाईचा येथे वायरमॅन या पदावर नोकरीस होते. अर्जदार यांनी मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्र. १ हि त्यांची पत्नी या नात्याने त्यांच्या पेंशनची रक्कम मिळणेबाबत प्रस्ताव पाठविला असता सदर कार्यालयाकडुन मयताचे कायदेशीर वारसांचा दाखला सादर करणेबाबत कळविले. अर्जदार यांना मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांच्या मृत्युपश्चात मयताच्या वारस दाखल्याची आवश्यकता भासत आहे. मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांना त्यांच्या मृत्युपश्चात वर नमुद अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असुन त्यांच्या नावाने वारस दाखला देण्यात यावा यासाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

४. अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र. १ यांचे शपथपत्र निशाणी क्र.१० वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा

पुनरउल्लेख केला असुन मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांचे वर नमुद अर्जदार हेच वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदार यांनी अर्जासोबत यादी निशाणी क्र.३ व २० सोबत मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर व बानोबी अब्बासशॉ फकीर यांच्या मृत्युदाखल्यांची पडताळणी केलेल्या प्रती, मयताचे ओळखपत्र, मयताचे एम.एस.ई.बी. मधील भविष्य निर्वाह निधी वैयक्तीक लेखा खाते व अर्जदार यांच्या आधार कार्डांची पडताळणी केलेल्या प्रती अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत.

६. अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'दैनीक पथदर्शी' यामध्ये दिनांक १२.११.२०२२ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत किंवा आजपर्यंत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

७. वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदार हे मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच दाखल कागदपत्रांवरुन मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर हे महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी, दोंडाईचा येथे वायरमॅन या पदावर नोकरीस होते. त्यांच्या पुराव्याची विश्वासार्हता बाधित होईल याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही. त्यामुळे दाखल पुराव्यावरुन अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे मयताचे वर नमुद अर्जदार हे अर्जामधील नमुद कौटुंबीक पेंशन कारणाकरीता कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र त्यांचे लाभात देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जदारांच्या मागणी प्रमाणे मयत गफ्फारशा अब्बासशा फकीर यांच्या मृत्युपश्चात कौटुंबीक पेंशन कारणाकरीता अर्जदार पत्नी नामे जैतुनबी गफ्फारशा फकीर, मुले नामे अकबर गफ्फार फकीर, शरीफ शा गफ्फार शा फकीर, असलम शा गफ्फार फकीर व मुलगी नामे सलमाबी जाकीर शाह

फकीर हे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVINASH WAMANRAO KSHIRSAGAR
Date: 2023.01.06 16:32:34 +0530

( अविनाश डब्ल्यु क्षिरसागर )

दिनांकः– ०६.०१.२०२३

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दोंडाईचा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ०६.०१.२०२३ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.